महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १७३ वे | दिनांक : १८/०६/२०२६ | वार : गुरूवार

## ठाकरेंचा पक्ष फुटला, ९ पैकी ६ खासदारांचा वेगळा गट!:लोकसभा अध्यक्षांना सोपवले पत्र



**मुंबई :** महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या (यूबीटी) नऊ खासदारांपैकी सहा खासदारांनी बंड केले आहे. सूत्रांनुसार, या सहा खासदारांनी बुधवारी सकाळी 9:30 वाजता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवून शिंदे गटाच्या शिवसेनेत विलीनीकरणाची विनंती केली आहे.

दिल्लीत सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'बाबत राजकीय वर्तुळात अद्यापही संभ्रम कायम आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या सहा खासदारांनी साथ सोडल्याची आणि त्यांनी सह्यांचे पत्र दिल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या बंडखोरीमुळे हे ऑपरेशन यशस्वी झाल्याच्या बातम्याही झळकल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात या सहा खासदारांचा कोणताही एकत्र फोटो किंवा त्यांनी स्वाक्षरी केलेले पत्र अद्याप समोर आलेले नाही, ज्यामुळे या दाव्यांबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

याच मुद्द्यावर बोट ठेवत, सहापैकी दोन खासदारांनी पत्रावर सह्या केल्याच नसून ते अद्यापही आपल्यासोबत असल्याचा विश्वास ठाकरे गटाकडून व्यक्त करण्यात आला आहे. लोकसभा अध्यक्षांना दिलेल्या पत्रात सहा खासदारांच्या सह्याच नसल्याचा दावा शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) केला आहे.

दरम्यान, या राजकीय घडामोडींवर आणि संबंधित खासदारांबाबत सध्या कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया देऊ नये, असे सक्त आदेश ठाकरे गटाने आपल्या नेत्यांना व पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.

सूत्रांनुसार, पत्र पाठवणाऱ्या खासदारांमध्ये नागेश आष्टीकर आणि संजय दिना पाटील यांचा समावेश आहे. संजय दिना पाटील यांनी पक्ष सोडण्याच्या चर्चा फेटाळून लावत म्हटले आहे की, "मी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचा खासदार आहे आणि पक्षातच राहीन." दरम्यान, शिवसेनेचे (यूबीटी) राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत बंडखोर खासदारांना शिवीगाळ केली. राऊत शिवीगाळ करताना म्हणाले, "हे बेईमान लोक आहेत. बेईमानी त्यांच्या रक्तात आहे. उद्धव ठाकरेंनी त्यांना भावासारखे वागवले आणि हे *XX#U* लोक, मी बोललेलं कट करू नका," असेही म्हणाले. ते नंतर माध्यमांना म्हणाले. "असे शब्द मराठीत सर्रास बोलले जातात."

गेल्या चार वर्षांतील शिवसेनेतील ही दुसरी फूट आहे. यापूर्वी, जून 2022 मध्ये, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली 39 आमदार शिवसेनेतून बाहेर पडले होते. या बंडामुळे उद्धव ठाकरे सरकार कोसळले होते. त्यानंतर शिंदे गटाला पक्षाचे मूळ शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाणाचे चिन्ह मिळाले.

सूत्रांच्या माहितीनुसार, लोकसभा अध्यक्षांनी या गटाला प्राथमिक मान्यता दिल्यानंतर उद्धवसेना नेतृत्वात खळबळ उडाली आहे. या घडामोडींची माहिती मिळताच खासदार संजय राऊत यांनी तातडीने संसद भवनात धाव घेत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची २० मिनिटे भेट घेतली आहे. या बैठकीत त्यांच्यासोबत खासदार अरविंद सावंत व अनिल देसाईही सोबत होते.

ठाकरे गटाने यापूर्वीच लोकसभा अध्यक्षांना पत्र देत कोणत्याही फुटीर गटाला स्वतंत्र मान्यता देण्यापूर्वी पक्षाची बाजू ऐकून घेण्याची मागणी केली होती. संसदीय पक्षनेते अरविंद सावंत यांच्या स्वाक्षरीने पाठवलेल्या पत्रात, "शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हाच संसदेतील अधिकृत पक्ष मानला जावा आणि कोणत्याही फुटीर गटाला विशेष दर्जा किंवा मान्यता देऊ नये," अशी विनंती करण्यात आली होती. आता सहा खासदारांच्या गटाला मान्यता मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर संजय राऊत स्वतः लोकसभा अध्यक्षांकडे उद्धवसेनेची भूमिका मांडणार असल्याचे समजते.

## 'देशात हुकूमशाही आणण्याचा प्रयत्न!':ठाकरे गटातील फुटीनंतर पृथ्वीराज चव्हाणांचा भाजपवर गंभीर आरोप



**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांच्या बंडामुळे राज्यातील राजकारण ढवळून निघाले असतानाच माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. ठाकरे गटातील फूट ही केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून देशात विरोधी पक्ष कमकुवत करण्याच्या मोठ्या राजकीय रणनीतीचा भाग असल्याचा दावा त्यांनी केला. तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनीही या घडामोडींना "ऑपरेशन बाजार" असे संबोधत सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका केली. उद्धव ठाकरेंच्या पक्षातील सहा खासदारांनी स्वतंत्र गटाच्या दिशेने पाऊल टाकल्याने महाविकास आघाडीत चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पृथ्वीराज चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधताना भाजपवर निशाणा साधला.

राज्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चेबाबत विचारले असता चव्हाण म्हणाले, "ऑपरेशन लोटस, टायगर, लायन... मला या जनावरांची नावे माहिती नाहीत. पण शिवसेना उद्धव ठाकरे गटात फूट पडल्याच्या बातम्या समोर येत आहेत. नऊपैकी सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र दिले आहे. त्यामुळे पक्षात विभाजन झाल्याचे स्पष्ट दिसत आहे."

पृथ्वीराज चव्हाण यांनी यावेळी भाजपच्या राजकीय उद्दिष्टांवरही प्रश्न उपस्थित केले. "नरेंद्र मोदी सरकारला परिसीमन (Delimitation) प्रक्रियेद्वारे उत्तर भारतीय राज्यांचे वर्चस्व वाढवायचे आहे. महिला आरक्षणाच्या नावाखाली संविधानात मोठे बदल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. देशात एका व्यक्तीची हुकूमशाही निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू असून लोकशाहीच्या दृष्टीने हा काळा दिवस आहे," असा आरोप त्यांनी केला.

विरोधी पक्षांतील नेत्यांवर दबाव टाकला जात असल्याचाही आरोप चव्हाण यांनी केला. "एका बाजूला ईडीसारख्या यंत्रणांची भीती दाखवली जाते आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक प्रलोभने दिली जातात. या दुहेरी कचाट्यात विरोधी पक्षांतील अनेक नेते अडकत आहेत. तुम्ही सत्ताधारी पक्षात आलात तर खोके मिळतील, कंत्राटे मिळतील आणि त्यातून कमिशनही मिळेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे," असे ते म्हणाले.

याचवेळी त्यांनी नरेंद्र मोदी सरकारला "प्रचंड भ्रष्टाचारी सरकार" म्हणत त्यांचे एकमेव उद्दिष्ट सत्ता टिकवणे आणि वाढवणे असल्याचा आरोप केला.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार रोहित पवार यांनीही सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत भाजपवर निशाणा साधला. रोहित पवार यांनी आपल्या ट्विटमध्ये लोकशाहीच्या सद्यस्थितीवर बोट ठेवत लिहिले, "लग्न एकासोबत करायचं आणि भलत्याचाच हात धरून पळून जायचं... हा अत्यंत किळसवाणा राजकीय व्यभिचार असून संविधान व लोकशाही मोडून हुकूमशाहीकडे वाटचाल सुरू असल्याचं हे लक्षण आहे. याला 'ऑपरेशन टायगर' नाही तर 'ऑपरेशन बाजार' म्हणावं लागेल. आणि हा 'ऑपरेशन बाजार' लायकीचा, माणसांचा की विचारांचा हे आता लोकंच ठरवतील.

## पुणे आकाशवाणीचा वृत्त विभाग बंद होणार नाही : केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची ग्वाही

**पुणे :** ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या पुणे आकाशवाणीचा वृत्त विभाग कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी दिली आहे. गेल्या काही दिवसांपासून या विभागाला टाळे लागणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. आता खुद्द केंद्रीय मंत्र्यांनीच यावर स्पष्टीकरण दिल्याने वृत्त विभाग बंद होण्याच्या सर्व अफवा आणि चर्चांना कायमचा पूर्णविराम मिळाला आहे.

आकाशवाणीचा वृत्त विभाग बंद होण्याच्या शक्यतेमुळे श्रोत्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर, केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या विषयात तातडीने लक्ष घातले. त्यांनी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पुण्याच्या दृष्टीने या वृत्त विभागाचे असलेले ऐतिहासिक महत्त्व त्यांच्या निदर्शनास आणून दिले आणि कोणत्याही परिस्थितीत हा विभाग कायम ठेवण्याची आग्रही मागणी केली.

रेल्वे विभागाच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आणि नव्या रेल्वे सेवांच्या लोकार्पणासाठी अश्विनी वैष्णव नुकतेच पुणे दौऱ्यावर आले होते.

त्यावेळी पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुरलीधर मोहोळ यांनी त्यांचे स्वागत केले आणि याच वेळी त्यांच्यात या प्रश्नावर महत्त्वाची चर्चा झाली. या चर्चेदरम्यान, पुणे आकाशवाणीचा वृत्त विभाग बंद करण्याचा कोणताही प्रस्ताव किंवा विचार केंद्र सरकारसमोर नसल्याचे अश्विनी वैष्णव यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितले, ज्यामुळे पुणेकरांना आणि आकाशवाणीच्या श्रोत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.



**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२६

## जिंतूर बनावट गुंठेवारी आणि खरेदीखत प्रकरणातील अटक आरोपीस जामीन

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : बनावट कागदपत्रे आणि मृत व्यक्तीच्या नावे बनावट आधार कार्ड तयार करून जिंतूर येथील ४००० चौ. फुटाचा भूखंड हडप केल्याच्या खळबळजनक प्रकरणात अडकलेले जिंतूर नगर परिषदेचे रोखपाल (लिपिक) सिताराम रामभाऊ कसबे यांना परभणीच्या माननीय सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे.या प्रकरणात, अकोला येथील रहिवासी सत्यजीत भास्करराव वानखेडे यांनी जिंतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती की, त्यांचे दिवंगत वडील डॉ. भास्करराव वानखेडे ज्यांचे १ मे १९९८ रोजी निधन झाले होते यांच्या मालकीचा जालना रोडवरील सर्व्हे नं. ११६/१/अ मधील ४,००० चौ. फुटाचा एक भूखंड होता. आरोपानुसार, एका अज्ञात व्यक्तीने मूळ मालक म्हणजेच डॉ. भास्करराव वानखेडे असल्याचे भासवून, बनावट आधार कार्ड (ज्यावर वय ४४ वर्षे दाखवले होते) तयार केले. या बनावट कागदपत्रांच्या आधारे जिंतूर नगर परिषदेचे तत्कालीन मुख्याधिकारी आणि नगर रचना अधिकारी यांच्याशी संगणमत करून गुंठेवारी प्रमाणपत्र मिळवले आणि २४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालयात या भूखंडाचे बनावट खरेदीखत करून घेतले. त्यानंतर या प्रकरणी जिंतूर पोलिसांनी १८ मे २०२६ रोजी गु.र.नं. २८३/२०२६ असा गुन्हा नोंदवला आणि तपास चालू केला. तपासादरम्यान पोलिसांनी तत्कालीन लिपिक सिताराम कसबे यांनी गुंठेवारी फाईलची पडताळणी करून त्यावर सही केली असल्याचा आरोप करत त्यांना २५ मे २०२६ रोजी अटक केली होती. अटक केल्यानंतर पोलिसांनी सिताराम कसबे यांची २ दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती, परंतु जिंतूर न्यायालयाने ती फेटाळून त्यांची रवानगी २६ मे रोजी न्यायालयीन कोठडीत केली होती. तेंव्हा पासून ते परभणी येथील कारागृहात बंदिस्त होते.यानंतर कसबे यांनी अॅड. सुनिल बुधवंत यांच्या मार्फत परभणी सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. अॅड. सुनिल बुधवंत यांनी सिताराम कसबे यांचा बचाव करताना मा. न्यायालयाला सांगितले की सिताराम कसबे यांना चुकीच्या पद्धतीने या प्रकरणात गोवण्यात आले असून त्यांचे नाव आरोपी म्हणून मूळ तक्रारीत (एफ. आय. आर. मध्ये) कुठेही नाही. तसेच सरकारी ओळखपत्र (आधार कार्ड) समोर आल्यावर ते खरे आहे असे गृहीत धरून पुढील प्रशासकीय प्रक्रिया करणे हे कर्मचाऱ्याचे कर्तव्य असते, आधार कार्डची सत्यता तपासण्याची कोणतीही यंत्रणा पालिकेच्या कर्मचाऱ्याकडे नसते, कसबे हे केवळ लिपिक/रोखपाल आहेत, नगर पालिकेच्या गुंठेवारी प्रमाणपत्रावर सिताराम कसबे यांची सही नाही, तसेच त्यांच्या अटकेमुळे पालिकेच्या रोखपाल विभागाच्या कार्यालयाची चावी त्यांच्या पत्नी शिवनंदा कसबे यांनी २९ मे रोजीच अधिकृतपणे नगर परिषद प्रशासनाकडे जमा केली आहे, त्यामुळे पालिकेच्या दप्तरात फेरफार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, सर्व संबंधित शासकीय कागदपत्रे पोलिसांनी आधीच जप्त केली असून अर्जदार तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे अशी बाजू मांडली. त्यानंतर सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर, मा. सत्र न्यायालयाने सिताराम कसबे यांच्या अधिकृत भूमिकेचा आणि परिस्थितीचा विचार करून त्यांना दि. १६ जून २०२६ रोजी जामीन मंजूर केला आहे. या निर्णयामुळे शासकीय कर्मचारी असलेल्या कसबे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सदरील प्रकरणात अॅड. सुनिल बुधवंत यांना अॅड. नरेश गव्हाणे यांनी सहकार्य केले.

## जामुवंतगडावर होणार ऑगस्ट २०२६ मध्ये तिसरा राज्यस्तरीय तिफण लेखक-वाचक मेळावा

**कन्नड / छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** वाचन संस्कृती रुजवणे आणि लेखक-वाचक संवाद दृढ करण्यासाठी त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद आणि सुखना बचाओ जनआंदोलन संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ऑगस्ट २०२६ मध्ये तिसरा राज्यस्तरीय तिफण लेखक-वाचक मेळावा आयोजित केला जाणार आहे.ही माहिती मेळाव्याचे संयोजक त्रैमासिक तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे, संशोधन परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, तिफण वाचक चळवळचे राज्याध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, उपाध्यक्ष डॉ. सुवर्णा गुंड-चव्हाण, कार्याध्यक्ष डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. सुधाकर जाधव,डॉ. यशवंत सोनुने, डॉ. सत्यशिला तौर,डॉ. एकनाथ शिंदे तसेच भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे अंबड शाखाध्यक्ष नारायण खरात, डॉ. मारोती घुगे, विजय जाधव,अशोक डोरले आदींनी दिली.हा मेळावा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील किनगाव-जामखेड येथील ऐतिहासिक आणि निसर्गरम्य जामुवंतगड परिसरात होणार आहे. शांत व निसर्गसंपन्न वातावरणात साहित्यिक चर्चा घडाव्यात, हा आयोजकांचा उद्देश आहे. नेमकी तारीख आणि कार्यक्रमपत्रिका लवकरच जाहीर केली जाणार आहे. जातुवंतगड व रोहिलागड हे ऐतिहासिक व धार्मिकस्थळे असून सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या परिसरात अनेक ऐतिहासिक स्थळे, आख्यायिका, लोककथा, प्रचलित असून बोलीभाषेच्या दृष्टिने अभ्यासकांसाठी आव्हानात्मक आहे.मेळाव्यामागे चार प्रमुख उद्दिष्टे आहेत. पहिले, ग्रामीण आणि निमशहरी भागात पुस्तक वाचनाची गोडी वाढवून वाचन संस्कृती रुजवणे. दुसरे, मराठी भाषेतील साहित्य निर्मिती आणि चर्चेला चालना देऊन वाङ्मयीन चळवळ गतिमान करणे. तिसरे, सर्जनशील लेखक आणि त्यांच्या वाचकांमध्ये थेट संवादाचा पूल बांधणे. चौथे, भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक संशोधनाला प्रोत्साहन देणे.कार्यक्रमात परिसंवाद, कथा-कविता वाचन, लेखकांशी मोकळ्या गप्पा, नवोदित लेखकांसाठी व्यासपीठ, पुस्तक प्रदर्शन आणि स्थानिक संस्कृती दर्शवणारे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.तिफण लेखक-वाचक मेळाव्याचे हे तिसरे वर्ष आहे. यापूर्वीचे दोन मेळावे अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथे यशस्वीपणे पार पडले होते. त्या मेळाव्यांना राज्यभरातून साहित्यप्रेमींचा मोठा प्रतिसाद मिळाला होता.जामुवंतगडावरील हा मेळावा मराठवाड्यातील साहित्यिक चळवळीसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. राज्यभरातील लेखक, समीक्षक, अभ्यासक आणि वाचकांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक डॉ. शिवाजी हुसे यांनी केले आहे.

## सीलबंद स्टोन क्रेशरचा खडीसाठा लंपास; महसूल विभागाची कारवाई, महिलेविरुद्ध गुन्हा

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : शासकीय आदेशानुसार सीलबंद करण्यात आलेल्या स्टोन क्रेशरचे सील तोडून लाखो रुपयांच्या खडीसाठ्याचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने जिंतूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी महसूल विभागाच्या तक्रारीवरून जिंतूर पोलिसांनी क्रेशर चालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, अवैध गौण खनिज उत्खनन आणि शासकीय मालमत्तेच्या संरक्षणाबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.महसूल विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मौजे मालेगाव येथील गट क्रमांक ७१ व ५३ मधील स्टोन क्रेशर तत्कालीन जिल्हाधिकारी, परभणी यांच्या आदेशानुसार ११ मे २०१७ रोजी सीलबंद करण्यात आले होते. त्यावेळी क्रेशर परिसरातील खडी व इतर साहित्याचा पंचनामा करून संबंधित साठा व्यवस्थापकाच्या ताब्यात देण्यात आला होता.मात्र, नंतर सीलबंद क्रेशरवरील शासकीय सील तोडण्यात आल्याची बाब महसूल प्रशासनाच्या निदर्शनास आली. याबाबत तलाठी सज्जा मालेगाव यांनी सादर केलेल्या अहवालात सील तोडल्याचा उल्लेख करण्यात आला होता. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारींची पडताळणी, उपलब्ध कागदपत्रांची तपासणी आणि महसूल विभागाच्या चौकशीनंतर गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.चौकशीत पंचनाम्यात नमूद करण्यात आलेला सुमारे एक लाख रुपयांचा खडीसाठा गायब झाल्याचे समोर आले. यात २० एमएमचा १२ ब्रास, १० एमएमचा १५० ब्रास आणि ६ एमएमचा २५ ब्रास खडीसाठा असल्याचे नोंदीत नमूद आहे. संबंधितांनी शासकीय आदेशाचे उल्लंघन करून सील तोडल्याचा आणि खडीसाठ्याचा अपहार केल्याचा आरोप महसूल विभागाने केला आहे.या प्रकरणी मंडळ अधिकारी कविता विलास फाजगे यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून प्रो.पा. शिला रामराव पवार, रा. जिंतूर यांच्याविरुद्ध जिंतूर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेतील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अवैध उत्खनन आणि गौण खनिजांच्या गैरव्यवहाराविरोधात महसूल विभागाने उशीरा का नाही पण या घेतलेल्या या कारवाईचे स्वागत होत असून, सीलबंद मालमत्तेची सुरक्षा आणि शासकीय संपत्तीच्या संरक्षणाबाबत प्रशासन किती सतर्क आहे, हे या प्रकरणातून अधोरेखित झाले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास जिंतूर पोलिसांकडून सुरू आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल** कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

**जाहिरात दर**

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२६


## निरागस हरीण

निरागस हरीण
दिसते किती छान
हिरवळीवर चरतांना
उंचावते मान

सुंदर त्याचे रूप
तपकिरी रंग
काटक शरीर
चपळ अंग

डोईवर शिंगे
उंच उंच मान
गवत खाण्यासाठी
तुडविते रान

उड्या मारीत पळने
कला त्याची न्यारी
झाडपाला खाते
शुद्ध शाकाहारी

लांब लांब कान
तीक्ष्ण व टोकदार
संकटाची चाहूल लागता
लगेच होतो पसार



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## पावसा पावसा पाणी दे रे

पावसा पावसा पाणी दे रे
शेत शिवार पेरू दे
पावसा पावसा पाणी दे
अन्नधान्य पिकवू दे रे

पाऊस पाणी पडू दे
रानमाळ फुलू दे रे
पावसा पावसा पाणी दे
गाई म्हशींना चारा दे रे

डोंगर हिरवे फुलू दे रे
झाडी वेलींना बहरू दे
पावसा पावसा पाणी दे
नदी नाल्यांना वाहू दे रे

हात जोडूणी विनंती करतो
विनवणी माझी ऐकून घे
पावसा पावसा पाणी दे
पिकाला जोमात बहरू दे रे



नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय गुणगौरव पुरस्काराने डॉ. सदाशिव पाटील सन्मानित




**कन्नड (अरुण थोरात) :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य बद्दल बी. दि. चेंज फाउंडेशन च्या वतीने मुंबई येथील आरंभ हॉल येथे दि.१४ जून रोजी राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. कन्नड शहरातील समाजकार्यात नेहमीच अग्रेसर असणारे युवा कार्यकर्ते डॉ. सदाशिव पाटील यांना मुंबई येथे सन्मानित करण्यात आले. मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य राष्ट्रीय सोहळ्यात देशभरातील विविध राज्यातील विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला. यात कन्नड येथील समाजसेवक डॉ. सदाशिव पाटील यांच्या रूपाने कन्नडचा शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदन वर्षे होत आहे. हा पुरस्कार स्वीकारताना डॉक्टर पाटील यांनी हा सन्मान आपल्या कुटुंब, सहकारी मित्र आणि समाजातील सर्व घटकांना व शुभचिंतक यांना समर्पित केला तसेच भविष्यातही समाज उपयोगी कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या राष्ट्रीय सन्मानामुळे त्यांच्या कार्यरत आणखीन जोमाने काम करण्याची इच्छा असून कन्नड च नाव सुद्धा लौकिक झालेला आहे. बी द चेंज फाउंडेशन च्या वतीने डॉ. सदाशिव पाटील यांना महिन्या भरपूर्वी दि.१७ मे रोजी शिर्डी येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र गुण गौरव हा पुरस्कार ही मिळाला होता. या समाजसेवा पुरस्काराबद्दल खासदार संदिपान जी भुमरे, माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी विरोधी पक्ष नेते आमदार अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, आमदार संजना ताई जाधव, माजी आमदार नामदेवराव पवार, माजी आमदार किशोर पाटील, कृषी भूषण डॉ. सिताराम जाधव व नगराध्यक्ष फरीन बेगम अब्दुल जावेद शेठ यांनी अभिनंदन केलं.

# देवदर्शनासाठी गेलेल्या कुटुंबाच्या बंद घरावर चोरट्यांचा डल्ला; अंदाजे २ लाखांचा ऐवज लंपास



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** शहरातील खैरी प्लॉट परिसरात बंद घर फोडून चोरट्यांनी सुमारे २ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी जिंतूर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत सुधाकरराव लाखे हे आपल्या बहिणी, भाऊजी व कुटुंबीयांसह तुळजापूर येथे देवदर्शनासाठी गेले होते. घराला कुलूप लावून सर्वजण बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी संधी साधून घरात प्रवेश केला.देवदर्शन करून १३ जून रोजी मध्यरात्री सुमारे एक वाजण्याच्या सुमारास लाखे कुटुंब परतल्यानंतर घरातील खोल्यांचे दरवाजे उघडे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात पाहणी केली असता साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आदी मिळून सुमारे २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे समोर आले.या घटनेची तक्रार जिंतूर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली आहेत. शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १८ जून २०२६

# दमकोंडी : मराठवाडी बोलीचा रांगडा कथानुबंध




**सं**भाजीनगर येथील सहशिक्षिका कवयत्री कथाकार मराठवाडी बोलीशैलीचा रांगडा कथा अनुबंध या कथेचा असल्याने ही कथा अस्सल झाली आहे.ज्योती सोनवणे दमकोंडी हा कथासंग्रह एकूण पंधरा कथा.'डाव'या कथेतील मुख्य पात्र सूत्र तुळसा सारं आयुष्य कष्टात घातलं तिच्या मनाची अदम्य् इच्छा एकदा पंढरपूर करावं.पुढं लेकाच्या हातात कारभार आला.अन्दोघं नवरा बायकोला त्याच्या हाताकडं पाहणं आलं.भावड्या मायीला पैसं देतं नाही.गावातल्या टेंपूत बसून जायसाठी पाचशे रुपये मी याजानं काढते पण आवंदा पंढरपूरला गेल्या बिगर राहणारचं नाही."ज्या आवलादीला माय-बापाची काळजी न्हाई त्या आवलादीला कशाला द्यायची आपली जनमभराची कमाई?त्या परीस ईकून आपल्या जीवाला खावा,नहीत गरीब दुबळ्याला देऊन टाकावं मंग बघा कसा माज उतरतो आवलादीचा ते"(पृ.२३)हे गाव खेड्यातीलं आजचं वास्तव आहे.कारण हे बायकोचेभाडे झाले आहेत.हा तुळसाचा 'डाव'यशस्वी होतो.'भूत' पलित करणी कवटाळ,सकून या भाकड गोष्टीआहेत.यावर एक वैज्ञानिक दृष्टिकोन देणारी सत्यविवेकी कथा आहे.पाटील पाटलाचे घर,त्यात बाया आणि त्यांचं जगण्याचं भावविश्व अतिशय मनस्वी लेखिकेने मांडले आहे.पण आजही सासूरवाशीनी मोठ्या मर्यादा घेऊन जगतात.या कथेतील सगुना तिला तिनं निगुतीनं एक डोरलं अन् पाच मनी कंबर पिशवीत ठेवले होते.तिच्या या पिशवीवर कुण्या चोट्यानं ध्यान ठेवलं.अन् कवानचं ती पिशवी घेऊन गवताडात पळाला.सगूना त्याच्या मागे पळाली. डोक्या एवढ्या गवतात झटापट झाली.तिच्या गालावर मुक्का मार दिला.चोटा पिसवी घेऊन पळाला.सगूना तिथंच कन्हत पडली.गावात अफवांचे पिक आले.सगूनाला भूताने घोसाळले."कोण्या मेल्यानं त्याचवर नजर ठुली.अन् त्या दिशी यही पिशी हुसकून पळू लागला.म्या पिशी सोडलीचं नाही तवा वढीत वढीत गरदाडात नेलं(पृ.३७)ही सत्य वदन गावकऱ्यांच्या समोर केले.भूत फित काही नाही.अशी डोळ्यात अंजन घालणारी सशक्त कथा.'चिंगारी' एक ठिणगी,फुंणगी,मनात पडली की,मनाची व्यथा काय होते म्हणून प्रत्येकाच्या मनात सदैव विवेकी चिंगारी पेटली पाहिजे.क्रांतीज्योती सावित्री ज्योतिबा फुले यांच्या विचारांची बांधिलकी घेऊन येणारी ही कथा आहे.वेदीका या उच्चशिक्षित मुलीने एक चिंगारी पेटवली आहे.आज महिला आरक्षणाच्या कायद्याने त्यांना पद मिळते पण त्या केवळ कळसुत्री सही करणाऱ्या अज्ञानी बायका असतात.गावात झालेल्या जळीत घटनेचा मागोवा घेतल्याचं पाहिजे म्हणून शितलची आई जी सरपंच आहे अनेक पद तिच्याकडे आहेत पण ती आजतगात गप्पच होती.तिच्या मनात चिंगारी पेटविण्याचं काम या कथेतील नायिकेनं केलं आहे.समकालीन गावं खेड्यातील,आईबाईच्या नावानं चांगभलं करणारी ही राजकीय बेंड फोडण्याचं काम ही कथा करते.'निर्धार'या कथेला धार आहे.पंढरीच्या वारीला नवरा बायकोला जायचे आहे.निघाची तयारी झाली नवरा गाई वासराला चारा टाकवं म्हणून वळहीची पेंढी काढताना साप डसला. ठकू पंढरपूरला नवऱ्याला घेऊन जाणार होती.तिनं रोज सवा रूपाय दानपेटीत टाकतं होती पांडुरंगाच्या नावानं तेच पैसे तिला नवऱ्याच्या दवाखान्यात काम आले.मनाचा निर्धार केला हेच माझं पंढरपूर."ठकू जन्मभर तुपल्या वारीला येयाला तरसली.पर त्वा काहीनाकाही अडचणी आणल्यास.इथून मोऱ्हं तुपली पुजा करणार नाही,का तुपल्या नावानं पैसं बाजूला टाकणार नाही."(पृ.५०)हा ठकूचा निर्धार शब्दांगार होऊन येतो.'रेश्मा' ही एक धुनं भांडे करणारी तिच्यावर अत्याचार करणारा पांढरपेशी नराधम.ही सखेद वेदनेची कथा मनाला विव्हळ करून जाते."तुझा मुलगा आजारी आहे ना?पैसे पाहिजे ना तुला? गप्प बस..मी देतो पाचशे रुपये.. हिशोबात पण धरणार नाही "(पृ.५४)'वचन' ही एक सृजनशील साथीदाराची गोष्ट.विधवा शेवंता तिचा चिमुरडा मुलगा वैभव.ईजेचा झटका लागून पती वारला.शेंवताच्या घरी काम करणारा सालगडी संतोष.शेवता ही हिंमतवान.इथे लेखिकेने स्त्री अंतःकरणाच्या हळव्या भावना व्यक्त केल्या आहेत.वावरात बेरं धरणारा संतोष तिला खाली पडताना सावरतो ती त्याच्या खांद्यावर हात देतं त्याला डोळेभरून निहाळते.पुढे"शेवंता होशील ना कायमची माझी? ज्योतीबा फुलेंचे विचार वाचलेत मी अन् त्यानुसार वागणार आहे.हे घे वचन आयुष्यभर तुला सुखात ठेवीन हा संतोष.."(पृ.६३)अशी सकारात्मक विचारधारेची ही कथा आहे.'कोंडमारा' होतोय आज हरेक स्त्री जीवनाचा ती जगते पुरुषी अहंकाराच्या काटेरी डोळ्यांच्या गचपनात.रवी नावाच्या एक हुशार विद्यार्थांची आई.सुनीता धुनं भांडे करून आपल्या एका मुलांसाठी जगते.तिचा नवरा दारुडा.सतत मारझोड, दारुसाठी पैसे.ती अतोनात जाच सहन करून केवळ मुलांच्या भविष्यासाठी जगते.तो मरतो.दुसरा पुरुष तिच्या असह्यतेचा फायदा घेतो.तिचे पैसे हडपतो,त्यांच्या पहिल्या बायकोच्या दोन मुली तिच्याच घरात आणतो.त्या मुलीही तिला त्रास देतात.तिच्या मुलांचे दप्तर घराबाहेर फेकून देतात.तो मावशीकडे आश्रयाला जातो.वर्गशिक्षिका असलेल्यालेखिका ज्योतीमॅडम.तीला सावित्रीमाईच्या संघर्षाची गोष्ट सांगते.सुनीता ही लोकं काय म्हणतील,समाज काय म्हणेल.या भितीने तूझी दमकोंडी होते आहे तू पोलिस स्टेशनला जाऊन या फालतू माणसाने मला फसवले आहे अशी तक्रार कर.असा सल्ला देते."सुनीताचं काय अनेक शिकल्या- सवरल्याले, मोठ्या पगारावर असणाऱ्या स्त्रीयासुध्दा मनाचा कोंडमारा करून जगताना दिसतात.त्याला जबाबदार फक्त एकच प्रश्न...समाज काय म्हणेल..?हा एक प्रश्न भाग पाडतो त्यांना आयुष्यभर दमकोंडी सहन करण्यास....!(पृ.७२)या समकालीन वास्तवाची ही कथा अत्यंत सकस आशय देऊन जाते.'मोकळा श्वास' ही एक स्त्री वेदनेची कथा अतिशय उत्तम आशय असलेली.महेश व मिरा.लग्न होऊन पंधरा वर्षे झाली.मुलं बाळ होतं नाही म्हणून मिराला वांझ ठरवल्या जाते.सासू सासरे तिला म्हणतात तू दुसऱ्या लग्नाला परवानगी दे सह्या करुन दे.ती तयार होतं नाही कारण हा दोष तिच्यात नाही.हे वचन ती सर्वांसमोर मांडते कारण डॉक्टरच्या रिपोर्ट ती दाखवते.सारेच भयभीत होतात.मिराचे महेशवर अतोनात प्रेम असते.तिला प्रचंड रडते.पण महेश तिला मिठीत घेत म्हणतो 'चल अनाथाश्रमातून मुलं घेऊन येऊ'हा स्त्री मनाचा 'मोकळा श्वास'मनाला दिलासा देतो.पण लेखिकेनेया कथेत अतिशय सृजनशील भावनेतून मातृत्व शिवाय स्त्रीत्व नाही.स्त्री किती महान असते.याचा प्रत्येय या कथेतून येतो.'पवळ्या' बइल विकायचा म्हणून सदा पोरानंलकडा लावला.त्यो म्हतारा झाला त्याला खाटका बिगर कोण घेणार.आपल्या खुट्याला मरुदी पर पवळ्या इकू नको.तात्यानं आपल्या पवळ्यासाठी अन्न पाणी सोडलं.अन एक दिवस तात्या पिवळ्याच्या खुट्या जवळ बेसूद पडलं.एका मुक्या बैलांच्या प्रेमाची ही गोष्ट."मला काय माहीत व्हतं तात्या तुम्ही एवढं टोकाचं वागतालं म्हुन.मला तुम्ही बी पाहिजीत अन् पवळ्याबी.आयकायलातना तात्या? पटकन बरे व्हा अन् घरी चला पवळ्या तूमची वाट पाहतोय...!(पृ.८७)ही ग्रामीण मनाची भावव्याकुळता उद्विग्न करुन जाते.'वझं' एक हळूवार गावं खेड्यातील प्रेमाची निस्सीम कहाणी.सुमी अन् रम्या अखंड प्रेमात होते.लग्न होऊन सुमी जाते.पंचमीला माहेरला येते.तेंव्हाती अपराधी भावनेने वागते.रम्याच तिच्या मनावरचं चिठ्ठी लिहून वझं कमी करतो.'आई' हे आराध्य दैवत असते.मातृत्व महान असते.मायेचा पान्हा फक्त माईलाच तटतटून येतो.जिथे इश्वराने आई निर्माण केली.या कथेतील नायिकेचा बा◌ॅस राजेश आपल्या मुलांसाठी आई शोधतो.चौदावर्ष प्रतिक्षा करतो.लेखिकेने अतिशय सुंदर असा एक प्रसंग लिहिला आहे.तिथे मन हळवे होऊन मन पाझरते.येईल तूझी आई,देईल तूला डबा."तू येतोस का आत्ताच सिद्धार्थ गार्डनमध्ये? आणि हो येताना आपल्या राहुललाही घेऊन ये.मला त्याला ही भेटायचं आहे...!(पृ.११०)अशी ही लग्नाला नकार देणारी मधू.'जाणीव'एक निकम सर त्यांच्या मातृत्व सृजनतेची कथा.वर्गात शिकवितांना मुलांना ही आपल्या आई बाबांच्या प्रेमाची अपेक्षा असते ही दीक्षा या विद्यार्थ्यीनीच्या वागण्यातून कळते.ही मनस्वी कथा हळवी करून जाते.'वास्तव'हेकधी ही वेगळंच असतं म्हणून दिसत तसं नसतं.शिक्षकी पेशामध्ये अतिशय चिंतन आशय संपन्न अनुभव येतात.तेव्हा खरे वास्तव तर शिक्षकचं अनुभवत असतो.कारण त्यांच्या विद्यार्थी दैवतांनी त्यांना साक्षात सांगितले असते.'न केलेली चुक'आजच्या समकालीन वास्तवाचे चटके देणारं वास्तव.श्रीमंत घरात दिलेली मुलगी रुपा तिच्या वाट्याला संशयाच्या भोवऱ्यात अडकून तिला मानसिक घुसमट करणारा नवरा अशी ही फोटोमुळे झालेली कथा.'खरी ओळख' वाचकांना खरी ओळख झाली पाहिजे.या कथेतील शितल अतिशय धाडसाने काहीतरी करु पाहते आहे.या पांढरपेशी शहरीकरणात मुली काही तरी सकारात्मक करू पाहता आहेत.पण ज्या रिकामटेकड्या गल्लीतल्या बायका नावे ठेवतात.मग ह्या स्त्रिया नेहमी दबावाखाली जगतात.या कथेतून आजच्या काळात क्रांतीज्योती सावित्रीमाईच्या विचारांची देणगी या कथेतून मिळते.बाईने आपली खरी ओळख दाखवणे हे काळाचे भाकीत आहे.ते या कथेत समर्थपणे आले आहे.ज्योती सोनवणे मॅडम यांच्या कथेला ख्यातनाम कथा लेखिका ललित गादगे प्रस्तावनेत लिहितात "कथा हा घोटीव असा साहित्य प्रकार आहे.आशय, कथानक व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती,या सगळ्यांचा तो गोळीबंद असा तो परिणाम असतो आणि हा परिणाम साधण्यासाठी प्रसंगोचित संवाद, त्यायोग्य शब्दकळा कथनशैली असावी लागते.म्हणून या कथांचं वैशिष्ट्य ठळकपणे जाणवतं आणि हेच या कथेचं बलस्थान आहे (प्रस्तावना) आपल्या सृजनशील मनोगतात "माझं बालपण ग्रामीण भागात गेलं.जे संस्कार त्या खेड्यात झाले.जे अनुभव मिळाले.ग्रामीण बोलीभाषेतील शब्द व नागर भाषेतील शब्द यातील ग्रामीण भाषेचा शब्द मला महत्त्वाचा वाटतो"तर या कथासंग्रहाची पाठराखण (ब्लर्ब)"दमकोंडी' या कथासंग्रहात गाव,खेडे, आणि शहरातील स्त्रीची दमकोंडी शब्दबद्ध करणाऱ्या या कथा आहेत.देहाची आणि मनाची कशी दुहेरी दमकोंडी हे स्त्रीचं भागध्येय!तिचा देह आणि तिचं मन दोन्ही अनेक गोष्टींनी पुन्हा-पुन्हा ओरबडलं जातं.तिचं अवघं आभाळ आकांत करीत गर्जत राहत.हे गरजणंही दबलेलं असतं.या तिच्या आर्त प्रवासाला शब्दरूप देणाऱ्या या कथा.(ललिता गादगे) मुखपृष्ठ अविनाश कुंभार यांनी बाई, नखशिखांत सुंदर लांबसडक केस.केसावर काटेरी जाळ्यांचे कुंपण.त्यावर बसलेले डोमकावळे.अतिशय चिंतन आशय संपन्न.या कथेच्या प्रवासाला मनस्वी हार्दिक शुभेच्छा.



**पुस्तक परिचय :- डॉ प्रभाकर शेळके, जालना**
**संवाद:-९९७५१३७३३७**